महाराष्ट्र जनशक्ती

ई-पेपर (पीडीएफ) आवृत्ती व्हॉट्सअप आणि सोशल मीडियावर शेअर करण्यास परवानगी आहे!

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे. बातम्या व जाहिराती ७५८८००५००२ या नंबरवर व्हाट्सॲप करा.

महाराष्ट्रातील जनसामान्यांच्या न्याय्य व हक्कासाठी लढणारी शक्ती

# महाराष्ट्र जनशक्ती

मुख्य संपादक : प्राचार्य डॉ. हसन इनामदार




छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) वर्ष : तिसरे अंक : ३५ वे दिनांक : २६/०१/२०२६ वार : सोमवार

## मनसेत भाकरी फिरवण्याची तयारी; पराभवानंतर संघटनात्मक उलथापालथीचे संकेत



**पुणे** : महापालिका निवडणुकीत झालेल्या दारुण पराभवानंतर महाराष्ट्र नवनिर्माण सेनेसमोर मोठं आव्हान उभं राहिलं आहे. कधीकाळी पुणे महापालिकेत २९ नगरसेवकांचा दबदबा असलेल्या मनसेला यंदाच्या निवडणुकीत एकही जागा मिळवता आली नाही. या निकालामुळे पक्षात अस्वस्थता पसरली असून, आता आत्मपरीक्षण आणि संघटनात्मक बदलांची प्रक्रिया सुरू होण्याचे स्पष्ट संकेत मिळत आहेत. पुणे हे मनसेसाठी महत्त्वाचं शहर मानलं जातं. मात्र याच शहरात पक्षाचा पूर्ण सफाया झाल्याने, आगामी काळात मोठे निर्णय घेतले जाण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

या पराभवावर मनसेचे सरचिटणीस हेमंत संभूस यांनी स्पष्ट आणि मोकळी भूमिका मांडली आहे. निवडणुकांमध्ये विजय-पराभव हे अपरिहार्य असतात, असं सांगत त्यांनी यंदाचा निकाल आम्हाला अपेक्षित नव्हता, हे मान्य केलं. पुणे महापालिका निवडणुकीत मनसेने पहिल्यांदाच शिवसेनेसोबत युती करत निवडणूक लढवली होती. मात्र ही युती आणि त्यातून उभा राहिलेला प्रचार अपेक्षित परिणाम देऊ शकला नाही. हा पराभव स्वीकारून पक्षांतर्गत सखोल आत्मचिंतन केलं जाईल, असं संभूस यांनी स्पष्ट केलं आहे.

निवडणूक प्रचाराच्या रणनीतीबाबत बोलताना हेमंत संभूस यांनी थेट कबुली दिली की, काही ठिकाणी पक्ष कमी पडला. ही निवडणूक म्हणजे धनशक्ती विरुद्ध संघटनशक्ती असा संघर्ष होता, असं सांगत त्यांनी प्रचाराची आखणी अधिक प्रभावी करता आली असती, याची जाणीव व्यक्त केली. मात्र याचा अर्थ जबाबदारी झटकणं नाही, असंही त्यांनी स्पष्ट केलं. पुण्यातील पराभव हा केवळ निकालापुरता मर्यादित न ठेवता, भविष्यासाठी धडा म्हणून घेतला जाईल, असंही त्यांनी नमूद केलं.

या पार्श्वभूमीवर मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांची भूमिका आता अत्यंत महत्त्वाची ठरणार आहे. हेमंत संभूस यांनी दिलेल्या माहितीनुसार, राज ठाकरे लवकरच पुण्यात येणार असून, शहरातील पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांची सविस्तर बैठक घेणार आहेत. या बैठकीत निवडणुकीचा आढावा, संघटनात्मक त्रुटी आणि पुढील दिशा यावर चर्चा होणार आहे. राज ठाकरे आणि शर्मिला ठाकरे यांच्याशी झालेल्या चर्चेनंतर पुणे मनसेमध्ये ठोस बदल दिसतील, असा दावा संभूस यांनी केला आहे.

या बदलांमध्ये केवळ मार्गदर्शनच नव्हे, तर प्रत्यक्ष संघटनात्मक निर्णय घेतले जाण्याची शक्यता आहे. पुणे शहर कार्यकारिणी, विभागीय रचना, जबाबदाऱ्यांचे पुनर्वाटप अशा अनेक बाबींवर फेरविचार होऊ शकतो. मनसेच्या स्थापनेपासून पुणे हे पक्षाचं प्रयोगशील केंद्र राहिलं आहे. त्यामुळे या शहरात पुन्हा संघटन उभं करण्यासाठी कठोर पावलं उचलली जातील, असं संकेत मिळत आहेत.

शहराध्यक्षपदाबाबत विचारणा करण्यात आली असता, हेमंत संभूस यांनी अतिशय सूचक उत्तर दिलं. फक्त शहराध्यक्षपदावर लक्ष केंद्रित करू नका, असं सांगत त्यांनी आगामी काळात पक्षात अनेक बदल होतील, असं स्पष्ट केलं. याचा अर्थ केवळ एक पद नाही, तर संपूर्ण शहर कार्यकारिणीत मोठे फेरबदल होण्याची शक्यता आहे. काही जुने चेहरे बाजूला केले जाऊ शकतात, तर नव्या कार्यकर्त्यांना संधी दिली जाऊ शकते, अशी चर्चा राजकीय वर्तुळात सुरू आहे.

एकूणच पुणे महापालिका निवडणुकीतील शून्य जागांचा निकाल मनसेसाठी मोठा धक्का ठरला आहे. मात्र या धक्क्यानंतर पक्ष पुन्हा उभारी घेण्यासाठी कोणती दिशा घेतो, हे महत्त्वाचं ठरणार आहे. राज ठाकरे पुण्यात येऊन भाकरी फिरवत संघटन मजबूत करतात का, नवे चेहरे पुढे आणतात का, की जुन्या जबाबदाऱ्यांमध्ये बदल करतात, याकडे आता केवळ मनसे कार्यकर्त्यांचंच नव्हे, तर संपूर्ण राज्याच्या राजकारणाचं लक्ष लागलं आहे.

## आधी स्वत:ची पात्रता तपासा, जिभेला लगाम लावा : विजय शिवतारेंवर रोहित पवारांचा पलटवार





**पुणे** : राज्यातील राजकारणात पुन्हा एकदा आरोप-प्रत्यारोपांची धार वाढली असून, शिवसेना शिंदे गटाचे नेते विजय शिवतारे आणि राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार गट यांच्यात जोरदार शाब्दिक संघर्ष रंगला आहे. विजय शिवतारे यांनी राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार आणि राष्ट्रवादीचे अध्यक्ष शरद पवार यांच्यावर अत्यंत तीव्र शब्दांत टीका केल्यानंतर हा वाद अधिक चिघळला. शिवतारेंच्या या वक्तव्यामुळे राष्ट्रवादी शरद पवार गटाचे आमदार रोहित पवार आक्रमक झाले असून, त्यांनी शिवतारेंवर जोरदार पलटवार केला आहे. त्यामुळे राज्याच्या राजकारणात नव्या वादाला तोंड फुटले आहे.

विजय शिवतारे यांनी आपल्या टीकेत शरद पवार आणि अजित पवार यांच्या दीर्घ राजकीय कारकिर्दीवर बोट ठेवले होते. शरद पवार यांनी चार वेळा मुख्यमंत्री म्हणून आणि अजित पवार यांनी पाच वेळा उपमुख्यमंत्री म्हणून कामकाज पाहिले. या काळात त्यांनी राज्यातील अनेक देवस्थानांना देणग्या दिल्या, मात्र पुरंदर तालुक्यातील खंडोबा मंदिर आणि त्या परिसराच्या विकासाकडे लक्ष देण्यासाठी त्यांना वेळ मिळाला नाही, असा आरोप शिवतारेंनी केला. त्यांनी पुरंदरच्या विकासाबाबत दुर्लक्ष झाल्याचा थेट आरोप करत पवार कुटुंबावर टीकेची झोड उठवली होती.

या टीकेला प्रत्युत्तर देताना रोहित पवार यांनी अत्यंत कठोर शब्दांत विजय शिवतारे यांच्यावर निशाणा साधला. तीन वेळा आमदारकी आणि पाच वर्षे मंत्रीपद भूषवूनही स्वतःच्या मतदारसंघाचा विकास करता न आलेल्या आमदाराला आदरणीय पवार साहेब आणि अजितदादा यांच्यावर टीका करण्याची राजकीय पात्रता आहे का, हे आधी तपासायला हवं, असा सवाल रोहित पवार यांनी उपस्थित केला. शिवतारेंनी केलेली टीका ही त्यांच्या स्वतःच्या कामगिरीवर पडलेली पांढरी फाशी असल्याचा टोला देखील त्यांनी लगावला.

रोहित पवार यांनी जेजुरी गडाच्या विकासाचा मुद्दा उपस्थित करत शिवतारेंच्या आरोपांना उत्तर दिले. श्रीक्षेत्र जेजुरी गडासाठी अर्थसंकल्पात घोषणा करून 350 कोटी रुपयांच्या विकास आराखड्यास मान्यता देण्याचे काम अजित पवार यांनीच केले, हे शिवतारे विसरले असल्याचा आरोप रोहित पवार यांनी केला. त्यामुळे विकासासाठी निधी दिला नाही, हा आरोप पूर्णपणे चुकीचा असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. टीका करताना शिवतारेंनी जिभेला लगाम लावावा, अन्यथा पोपटासारखं मिठू.. मिठू बोलणाऱ्यांचं पुढे काय होतं, याचा अनुभव त्यांना आधीच आलेला आहे, असा खोचक टोला रोहित पवार यांनी लगावला.

रोहित पवार यांनी पुढे म्हटले की, विजय शिवतारे यांनी आज जी टीका केली आहे, ती प्रत्यक्षात त्यांच्या स्वतःच्या नाकर्तेपणाची कबुली आहे. ज्या पक्षाने त्यांना आमदारकी दिली, मंत्रीपद दिलं, त्याच पक्षाला त्यांनी फसवलं. त्यामुळे अशा व्यक्तीकडून विकासाची अपेक्षा तरी काय करायची, असा सवालही त्यांनी उपस्थित केला. शिवतारेंनी केलेली वक्तव्ये ही केवळ राजकीय अस्वस्थतेतून आलेली असून, त्याला कोणताही ठोस आधार नसल्याचे रोहित पवार यांनी स्पष्ट केले.

## शिवसेना कार्यालयावर राष्ट्रवादी खासदाराचा फोटो; भिवंडीत चर्चांचा भडका



**मुंबई** : राज्यातील राजकारणात गेल्या काही वर्षांत घडलेल्या घडामोडींमुळे पक्षीय राजकारणाची समीकरणे सतत बदलताना दिसत आहेत. कोणता पक्ष कधी कोणासोबत युती करेल, कोणता नेता कधी पक्षांतर करेल, याचा अंदाज लावणे आता कठीण झाले आहे. सोलापूर जिल्ह्यातील बार्शीत जिल्हा परिषद निवडणुकांसाठी दोन शिवसेना एकत्र आल्याचे चित्र राज्याने पाहिले असतानाच, आता ठाणे जिल्ह्यातील भिवंडी तालुक्यातील कोनगाव येथे एक वेगळीच राजकीय चर्चा रंगू लागली आहे. येथे शिवसेनेच्या उपतालुकाप्रमुखांच्या जनसंपर्क कार्यालयावर लावण्यात आलेल्या बॅनरमुळे राजकीय वर्तुळात संभ्रम आणि तर्कवितर्कांना उधाण आले आहे.

कोनगाव येथे शिवसेना उपतालुकाप्रमुख विवेक म्हात्रे यांच्या कार्यालयावर लावलेल्या बॅनरवर एका बाजूला राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार गटाचे खासदार सुरेश म्हात्रे उर्फ बाळ्या मामा यांचा फोटो, तर दुसऱ्या बाजूला शिवसेनेचे मुख्य नेते व राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे तसेच खासदार श्रीकांत शिंदे यांचे फोटो एकत्र झळकले आहेत. विरोधी विचारधारेतील नेत्यांचे फोटो एकाच बॅनरवर दिसताच राजकीय चर्चांना वेग आला. हा बॅनर सोशल मीडियावर झपाट्याने व्हायरल झाला असून, विविध राजकीय अंदाज वर्तवले जाऊ लागले आहेत.

या बॅनरमागे नेमका राजकीय अर्थ काय, शिवसेना आणि राष्ट्रवादीमध्ये काही नव्या घडामोडी घडत आहेत का, अशा चर्चा सुरू झाल्या असतानाच विवेक म्हात्रे यांनी यावर स्पष्टीकरण दिले आहे. त्यांनी स्पष्ट शब्दांत सांगितले की, खासदार सुरेश म्हात्रे उर्फ बाळ्या मामा हे आमच्या कुटुंबातील सदस्यासारखे आहेत. ते आमचे गुरुवर्य आणि आधारस्तंभ असून, लहानपणापासून त्यांनी मला मार्गदर्शन केले आहे. अनेक प्रसंगी त्यांनी मला सांभाळून घेतले असून, त्यांच्या प्रती आदर व्यक्त करण्यासाठीच त्यांच्या फोटोचा बॅनरवर समावेश करण्यात आला आहे, असे विवेक म्हात्रे यांनी सांगितले.

विवेक म्हात्रे यांनी पुढे स्पष्ट केले की, आपण शिवसेना शिंदे गटाचे उपतालुकाप्रमुख आहोत. एकनाथ शिंदे हे आमचे पक्षप्रमुख आणि मुख्य नेते आहेत, तर खासदार श्रीकांत शिंदे हे देखील आमचे मार्गदर्शक आहेत. त्यामुळेच पक्षाच्या नेत्यांचे फोटो बॅनरवर लावण्यात आले आहेत. या बाबतीत कोणताही राजकीय अर्थ काढू नये किंवा गैरसमज पसरवू नये, असे आवाहनही त्यांनी केले. हा बॅनर कोणत्याही नव्या युतीचा संकेत नाही, तर वैयक्तिक सन्मान आणि पक्षनिष्ठेच्या भावनेतून लावण्यात आला आहे, असे त्यांनी ठामपणे स्पष्ट केले.

दरम्यान, या प्रकरणावर राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार गटाचे खासदार सुरेश म्हात्रे उर्फ बाळ्या मामा यांची कोणतीही अधिकृत प्रतिक्रिया समोर आलेली नाही. त्यामुळे चर्चांना आणखी खतपाणी मिळाले आहे. राज्यातील बदलत्या राजकीय घडामोडी आणि अलीकडच्या काळात घडलेल्या अनपेक्षित युती-आघाड्यांच्या पार्श्वभूमीवर हा बॅनर अनेकांच्या भुवया उंचावणारा ठरला आहे. भिवंडी परिसरातही या विषयावर मोठ्या प्रमाणावर चर्चा रंगत आहे.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), सोमवार २६ जानेवारी २०२६


## डॉ. सौ. इंदिराबाई भास्करराव पाठक महाविद्यालयात नेताजी सुभाषचंद्र बोस जयंती साजरी

**छत्रपती संभाजीनगर :** डॉ. सौ. इंदिराबाई भास्करराव पाठक महाविद्यालय, छत्रपती संभाजीनगर येथे थोर स्वातंत्र्यसैनिक नेताजी सुभाषचंद्र बोस यांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. कार्यक्रमाच्या प्रमुख वक्त्या म्हणून प्रा. रविंद्र परभाणे यांनी नेताजींच्या देशभक्ती, त्याग आणि स्वातंत्र्यलढ्यातील योगदानावर सखोल मार्गदर्शन केले.कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. सुनीता बाजपाई उपस्थित होत्या. त्यांनी अध्यक्षीय समारोप करताना विद्यार्थ्यांनी नेताजींच्या विचारांचा आदर्श घेऊन राष्ट्र उभारणीत सक्रिय सहभागी व्हावे, असे आवाहन केले.या कार्यक्रमास विद्यार्थी संसद प्रमुख चक्र नारायण मॅडम तसेच पर्यवेक्षक प्रा. माधुरी भावसार यांची प्रमुख उपस्थिती होती. कार्यक्रमादरम्यान शीख धर्माचे नववे गुरू श्री गुरु तेग बहादुर यांची जयंती निमित्त त्यांचे बलिदान, धर्मनिष्ठा व मानवतावादी विचार अधोरेखित करणारा माहितीपूर्ण व्हिडिओ दाखवण्यात आला. हा उपक्रम राबवण्यासाठी प्रा. निलेश वैद्य यांनी विशेष प्रयत्न केले.याच कार्यक्रमाच्या निमित्ताने राष्ट्रीय मतदार दिवस साजरा करण्यात आला. यावेळी उपस्थित सर्व शिक्षक, प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थ्यांना लोकशाही प्रक्रियेत सक्रिय सहभाग घेण्याची व मतदानाचा हक्क बजावण्याची शपथ देण्यात आली.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्याम घोरतळे यांनी प्रभावीपणे केले. तर शेवटी आभार प्रदर्शन डॉ. मीनाक्षी देव यांनी मानले.कार्यक्रमाला महाविद्यालयातील शिक्षकवृंद, कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी सर्वांचे सहकार्य लाभले.

## शपथ कॉफीमुक्त भयमुक्त बारावी बोर्ड परिक्षेला सामोरे जाण्याची



**कन्नड (अरुण थोरात) :** जिजामाता कनिष्ठ महाविद्यालय निपाणी ता.कन्नड येथे बारावी मध्ये प्रविष्ट असणाऱ्या विद्यार्थ्यांना येणाऱ्या फेब्रुवारी मार्च २०२६ मध्ये बोर्ड परीक्षेला भयमुक्त आत्मनिर्भर वातावरणामध्ये विद्यार्थ्यांनी परीक्षेला सामोरे जाण्यासाठी, विभागीय मंडळ व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ यांच्या निर्देशनानुसार नावीन्यपूर्ण उपक्रमा अंतर्गत. जिजामाता महाविद्यालय निपाणी येथील सर्व शाखांमधील विद्यार्थी व प्राध्यापकांनी कॉपीमुक्त अभियानाची शपथ घेण्यात आली. बोर्ड परीक्षा म्हटली की अभ्यासाचे नियोजन असूनही विद्यार्थी दडपणाखाली पेपरला सामोरे जाताना दिसून येतात. त्यामुळे गोंधळाची स्थिती निर्माण होते. त्यांच्या गुणांवर परिणाम होत असतो. यासाठी विद्यार्थ्यांनी वेळेचा सदुपयोग करून येणाऱ्या परीक्षेला आपल्या अभ्यासाचा बळावर उज्वल यश संपादन करावे. असे प्रतिपादन प्राध्यापक अजमेरा यांनी आपल्या महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करून त्यांच्या आत्मविश्वासात वाढ केली. या उपक्रमामध्ये महाविद्यालयातील सर्व विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्तपणे सहभाग नोंदवला व परीक्षेपूर्वी असणाऱ्या वेळेचा सदुपयोग नियोजनबद्ध करून येणाऱ्या परीक्षेला हसत खेळत सामोरे जाऊ असा दृढ संकल्प केला. या सर्व उपक्रमांमध्ये महाविद्यालयातील प्राचार्य गोंगे बी टी यांनी विद्यार्थ्यांना पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या यावेळेस प्रा. चव्हाण जी ए प्रा मोरे बी आर प्रा पवार वाय आर प्रा सोमवंशी एस एस प्रा काटे बी बी प्रा भवर एस जी प्रा. श्रीमती पवार व आटोळे ए आर बोरसे ए व्ही हे सर्व उपस्थित होते.

## प्रजासत्ताक दिन

विविधतेने नटलेला
माझा भारत देश महान
प्रजासत्ताक दिनाला
गाऊया शुरविरांचे गान

भारतमातेच्या रक्षणासाठी
शहिद झाले देशभक्त
पावन केली माती
सांडून आपले रक्त

देशभक्ती अंगी संचारते
ऐकून शुरविरांची गाथा
शहिद जवानांसाठी
आदराने झुकतो माथा

भारतभूमीच्या अभिमानाचा
राष्ट्रध्वज आपण फडकवूया
शहिदांचे बलिदान
मनामनात रूजवूया

भगतसिंग, राजगुरू, सुखदेवचे
व्यर्थ न ठरले बलीदान
भारत देश माझा
साऱ्या जगात महान



- **रवींद्र चालीकवार**
मु.पो.ता.महागाव
जि.यवतमाळ
मो.9011559106




# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), सोमवार २६ जानेवारी २०२६

## भूमीजनांच्या दु:खाची सल मांडणारी कविता : हे ही दिवस जातील




कवी नारायण खरात अंबड यांच्या 'हे ही दिवस जातील' या कवितेने एक सृजनशील निस्सीम भूमियांची भक्ती.वृक्षसूक्त,हिरवे हिरवे श्वास' ओघळते दु:ख तीनअर्थपूर्ण विभागातून शब्दांगार होऊन आल्या आहेत.कवी मनाच्या अदम्य् विश्वासाचा एक सृजनशील स्नेहाळू खोल कप्पा असतो.तो निस्सीम भक्तीचा मळा म्हणून फुलतं असतो.यात शब्द स्वर जेंव्हा या सृष्टीचे सौंदर्य,राग,लोभ मोह,मद या पलीकडे जाऊन.सत्यनिवेशीदगडावर मनाच्या मळभाचा शेंदूर फासून ललाटी अद्वैत भाळ निर्माण करतो ती कविता असते.असे अस्सल दु:खाचे सल कवी नारायण खरात आपल्या हाती देऊन जातात.भगवंत भाव भक्तीचा भूकेला आहे म्हणून ही ओंजळभर शब्दफुले कधी अंगार तर कधी केवळ आर्त भाव व्याकुळ होऊन विठ्ठलाच्या साधक साधनेची आराधना करते.या व्याकुळ आर्ततेने हे दु:ख पसाभर होऊन मन गहिवरून येणारी ही कविता आहे.आत्मरंग हाशब्द अक्षरांचे भंडार असतो.तो जितका खोलवर चिंतनाच्या डोहात जाईल तितकी ती अस्सल ओंजळभर ओल घेऊन येणारी कविता असते.कवीवर्य सन्मित्र नारायण खरात अंबड.याचा 'हे ही दिवस जातील' हा कवितासंग्रह म्हणजे कृषीसुक्तांचे वेदन.या सनातन वेदनाची मांदियाळी दु:खाच्या खपल्या काढीत बसतं नाही तर एक भूमीजनांच आभाळभर पांगले दु:ख शब्दातीत गोळा करतो. पहिल्या वृक्षसूक्ताच्या कवितेत ते लिहितात. "कुणब्याला कोण वाली,सारे भोवताली मवाली. दुष्काळाशी झुंजायाला,त्याची लढत एकली"(पृष्ठ ६)दुष्काळाशी झुंज ही कायमची चं, तरीही दु:खाची विरक्ती भंगवताकडे आळवणी आलीचं.तिफणीच्या चाड्यावर मुठ धरू नका का?मी नियमित वारी करणारा भक्त आहे.पाऊस रूसला की,हे आंनदाचे गोकुळच रिते होऊन जाते या शेतीमातीशी इमान घेऊन जगणारा जगाचा पोशिंदा शेतकरी बाप ही कविता अतिशय आशय संपन्न सृजन समर्पक मनाचा ठाव घेणारी होऊन जाते जसे,"बाप जन्मला मातीत, जन्म झाला शेतीमाती.कवी तुटतील सांगा,माय लेकराची नाती..."(पृष्ठ १०)आर्त हाक मारत ही कविता मनस्वी हृदयात कोवळा मायेचा ओलावा देऊन जाते.मेघराज्याला आळवणी करणारे 'नाऊ'ही उपाधी सार्थ ठरते.मातीची ओल उडत चालली की कुणबी हवालदिल होतो.ज्याचं उभं पिकं करपून जातं उघड्या डोळ्यांनी पिकाचं मरण पाहणारा हा शेतकरी या जगाचा पोशिंदा आहे .या निळ्या आभाळाची माय या सृष्टीला सृजन स्नेहाळू भाव आहे पण जेव्हा धरणीचा पान्हाच आटून गेला की,ती या पृथ्वीवरील पाषाणाला आर्त हाक मारते.'पाषणाला ओलं फुटे'या प्रतिमेतून कवीचं निर्लेप नितळ दुष्टी दिसून येते.या मरण 'खाई'त कुणब्यांना मरणाच्या यातना भोगतं राहावं लागतं.तरीही या भुईमाईसाठी मनाच्या अदम्य् इच्छेने इथला कृषक उद्याच्या आशेवर ठाम विश्वास ठेवून 'जातीलं 'हेही दिवस जातील'.ही कविता कुणब्यांच्या प्रचंड आत्मविश्वासाची धारदार निर्धाराची कविता आहे.'दुष्काळ दूश्मन'शेतकरी कष्टकऱ्यांच्या वाट्याचा.म्हणून ही 'बळीखंत' या बळीवंताच्याचं वाट्याला सदोदित ओला,कोरडा, दु:ख दुष्काळ या दुष्काळाचा तोंडवळा कवीने मांडला आहे.'या साऱ्या शिवारभर पसाऱ्यात केव्हा 'मुके घरटे'होऊन जाईल पता नाही.'पांढरं सोनं' ही कविता "मह्या पांढऱ्या सोन्याची, कशी झाली वाताहत. बाप येडापिसा झाला,काढी जागूनिया रात.. घाव अस्मानी सुलतानी, मह्या बापाला बसती. देणेकरी गणगोत,नाग होऊन डसती..."(पृष्ठ १७)अशी अस्सल डंख देणारी कविता मन पिळवटून टाकते.जेंव्हा डोळ्यात आंनदाचे डोह मनभरू येणारा ऊस.त्या उसाच्या फडाचे सरण उघड्या डोळ्यांने पाहवे लागते.ती वेदना मनातून जात नाही.गारपीटचा अंभग मनाचे दुभंग करून जातो.तुम्ही आम्ही वृक्षवल्ली आम्हा सोयरे वनचरे म्हणता'वृक्षसूक्ताची सखेद वेदना.एक वृक्ष त्यामागील मानवी मनाच्या भावनीक संवेदना अतिशय तरलतेने कवीने उद्धृत केल्या आहेत.हे कवीचं मुक्त व्यक्त होणं म्हणजे आत्मिक स्वानंदची घालमेल आहे.'कोण वाली'अस्मानी सुलतानी संकट शेतकऱ्यांची पाठ सोडत नाही, दु:ख दुष्काळाचे तळ कायमचं खळ करून राहते.गायी गुरांना चारा पाणी नाही म्हणून गळ्यातलं दावा सुटतं नाही.तरीहीविकावं लागतं.तर गारपीटीत गायगुरांच आख्ख खांडचंमरुन जातं 'यम गायगुरामागे'ही कविता मन हेलावून टाकणारी आहे गाय गोठ्यात वासरांचा टाहो उद्विग्न करतो.चारा,वळाई,काटी,कुपाटी,या साऱ्यांची धुळधाण करणार 'वळीव' हैदोस घालून जातो.या वेदना सहन करताना मोंढ्यातल्या भोंड्याने कितीही माल धापला तरी त्याच्या ही ऋणाईत राहणारा या भूमीचा भूमिपुत्र त्याचे महानत्व व्यक्त करते.या कवितेचा मर्मग्राही अनुबंध म्हणजे 'आत्महत्या', 'वाळू उपसा','राहटगाडगे''नदीमाय' सांग ना ग आई, आळवणी,या कवितेतून भूमीनिष्ठाच्या व्यथा वेदनांची ठणक अतिशय आशय संपन्नतेने आली आहे.'हिरवे हिरवे श्वास' या अनुबंधात या गावशिवारात हिरवे रावे मनमस्तिकाच्या कवेत घेऊन सृजनशील मन श्वास पेरणी करून जाते.यात 'दींडी' 'आई' 'संसार','माप करा पोरींनो' जग हे कातळ या कवितेमधून मनस्वी नाळ नात्याचे स्नेह भाव व्यक्त झाले आहेत.तर जे मनात, ध्यानात,कानात,अन् डोक्यात होते ते दिसतं नाही कवी लिहितो "गेले कुठे.वाहणारी नदी नाही,पोहणारी मुलं नाही नाचणारी मोर,चरणारी गुरं,साचलेले तळे,फुलणारे मळे नाही,गुरांचे खळे,वासरांचे लळे, पाखरांचे थवे,काजव्याचे दिवे,गुराख्यांचे पावे, हिरवेगर्द रावे,गाई म्हशीचे गोठे, बैल आणि पेठे, दिसेनात कोठे, वैभव हे मोठे, बालसुलभ लडीवाळपणा दिसत नाही (पृष्ठ ४७)या कवितेने समकाल अतिशय समर्पक मांडला आहे.उध्वस्त खेड्यातील सर्वहरा कुणबाऊपणा राहिलाच नाही ही सखेद भेदक वास्तव कवीने मुखर केले आहे.दरवळ आईचा, बैलपोळा सण माईचं जगणं,गाव बदलत आहे,माईचं सपन,जग जरा,तुझी माझी धावपळ,काळीज कोंदण,भाऊगुज, मायबाप,या कवितेमधून एक निस्सीम मायबापची भक्ती व आजच्या पिढीतील बदलत जाणारे भावबंधाचे नाते व्यक्त होते.काळ धावतो आहे.वसंत येतोच आहे.आठवांचे खंदक खणून काढले जाते 'असे होते,तसे होते'म्हणत 'आई'नेच हे सारे विश्व दाखविले.म्हणून ही कवी असल्याची पुण्यवंत कविता अशी,"आईहुन सांगा मोठे दैवत हो कोठे तीर्थ नाही तिच्याहून कोणतेच मोठे!तिच्या ठायी पंढरपूर,काशी तिच्या ठायी...जगामध्ये थोर असे साऱ्याहुन आई!कुणाकुणालाच तिची सर येतं नाही.||धृ||(पृष्ठ ६३)या कवितेनं कोरोना काळाची जखमाळलेली भयंकर वेदना ही मुखर करीत भावभक्तीची प्रार्थना ही केली आहे.जगण्यावरचा श्रध्देय भाव या कवितेने दिला आहे.म्हणून ही कविता संयत मनोभूमिकेतून ठाम आत्मविश्वास देऊन जाते "हेही दिवस जातील" "चिंता नको चिंतन करू, दुष्काळ सुक्या ओल्यावर हेही दिवस जातीलच, चांगले दिवस आल्यावर संकटाला भेल्यावर,फाशी घेऊन मेल्यावर सुटतील का प्रश्न, स्वतः निघून गेल्यावर "(पृष्ठ ७५).या कवितेची तीन अर्थपूर्ण भागात विभागणी करीत 'ओघळते दु:ख' मनातील अभंग भावना व्यक्त करणे हे कवीचे मनस्वी मनोज्ञ भाव आहे.या धराच बंदीशाळा झाली आहे.कोरानाचा काळ बाई ग, आकलनाच्या पलिकडल्या गोष्टी घडल्या.रडत होती बाई, विठ्ठलाला भांडू,करुणेला धाप,वितळते मन, अखंडित वारी, जिद्द या भयान काळाचे भाकीत भान कवीने आपल्या भोवतालशी तत्कालीन भयभीत माणूस किती कण कण व क्षणभंगुर आहे याची दखल करून दिली आहे.या कवितेची पाठराखण ख्यातकीर्त कवी व काव्यचिंतनशील भाष्यकार प्रा अशोक बागवे लिहितात "शब्द हा अवकाशाचा गुण आहे.निराकार ध्वनी कवीच्या ओंजळीत येतो नि कविता साकार होते.ही शब्दांची ओल अवकाशाला परत करणे म्हणजे निर्मिती प्रक्रिया होय!! 'सांगताना सई/शब्दांमध्ये ओल' अशी माती ओली झाल्याशिवाय निर्मिती असंभव आहे.नारायण खरात यांचा 'हेही दिवस जातील' हा कवितासंग्रह वाचताना मला यांचे प्रत्यंतर आले."तर मुखपृष्ठ व अतील चित्रे ख्यातनाम चित्रकार संतोष धोंगडे, पुणे यांनी केली आहे.मुद्रीत शोधन अभिजात भाषा अभ्यासक विनोद जैतमहाल यांनी केले आहे.

**कवी नारायण खरात यांना हार्दिक शुभेच्छा.**

**पुस्तक परिचय:- डॉ प्रभाकर शेळके, जालना**

**पुस्तक नावं :-हे ही दिवस जातील**
**कवी : नारायण खरात, अंबड**
**प्रकाशक : सत्य प्रकाशन, पुणे**
**प्रथम आवृत्ती : ५जून २०२४ (पर्यावरण दिन)**
**मुखपृष्ठ : संतोष धोंगडे, पुणे.**
**अक्षरमुद्रण : विनोद जैतमहाल, जालना**
**किंमत:-१७५ रुपये**

## गाव झोपलेलं आहे

ज्ञानाची वात विझत चालली, तरी गाव झोपलेलं आहे,
शाळा ढासळत असताना देखील सारा गाव झोपलेलं आहे.

डोंगरदऱ्यात दिवा पेटवला, गुरुजींनी प्राण ओतले,
तोच दिवा मावळतोय आज, पण गाव झोपलेलं आहे.

भूक-तहान, ऊन-पाऊस झेलत गुरुजी उभे होते,
आज त्याच डोळ्यांत पाणी आहे—तरी गाव झोपलेलं आहे.

या शाळेतून घडले साहेब, डॉक्टर, इंजिनिअर,
त्यांच्याच मुळावर घाव पडतोय, तरी गाव झोपलेलं आहे.

पटसंख्या, कागदी नियम, प्रशासनाचा डाव,
शाळांवर हातोडा चालतोय, तरी गाव झोपलेलं आहे.

शाळा बंद म्हणजे फक्त कुलूप नाही रे दारावर,
संस्कृती जळतेय चितेवर, तरी गाव झोपलेलं आहे.

आज उठलो नाही तर पोरांचं भविष्य गाडलेलं आहे,
गप्प बसण्याच्या अपराधात, आपलं गाव झोपलेलं आहे.

आज स्पष्ट, ठाम शब्दांत—ही शेवटची हाक,
ज्ञान वाचवायचं असेल तर उठा—नका झोपलेलं राहू!

**प्रभाकर गायकवाड**
छत्रपती संभाजीनगर

दै. महाराष्ट्र जनशक्ती हे महाराष्ट्रातील मराठी भाषेत वाचले जाणारे प्रमुख ई-दैनिक आहे. आपल्या व्यवसायाची जाहिरात करून व्यवसायवृद्धी करा.

**जाहिरात दर**

| | | |
|---|---|---|
| १. | पूर्ण पान (मल्टीकलर) | ५०००/- |
| २. | अर्धे पान (मल्टीकलर) | ३०००/- |
| ३. | पाव पान (मल्टीकलर) | २०००/- |
| ४. | शुभेच्छा जाहिरात | ६००/- |

## प्रजासत्ताक राष्ट्र

सव्वीस जानेवारी रोजी,
भारतास संविधान मिळाले.
बहुजनांची गुलामगिरी,
कायम कोसो दूर पळाले. १

बाबासाहेबांच्या कष्टाने,
संविधान निर्मिती झाली.
संविधानाच्या अधिकाराने,
शिक्षण संधी घेऊन आली.२

प्रजासत्ताक राष्ट्र होताच,
लोकशाही इथे नांदली.
कायद्याने सर्व समान,
होताच गुलामी पांगली. ३

प्रजासत्ताक दिन आज,
करू साजरा आनंदाने.
इथे लोकशाही नांदवू,
सदा सर्वदा अभिमानाने. ४

प्रजासत्ताक जनतेला,
हक्क मिळाले समान.
सांभाळता येणार इथे,
प्रत्येकाला देशाचे कमान. ५

बा भिमरायांचे उपकार
आहे तुम्हा आम्हा सर्वांवरी
संविधानाचे वाचन करावे
सर्व भारतीयांनी घरोघरी. ६



**नागेश बोंतेवाड,**
**छत्रपती संभाजीनगर**

## इंग्रजी भाषा ही रोजगार निर्मितीचे साधन! : प्रा. डॉ. मनोजकुमार नवसे



**पाटोदा (प्रतिनिधी) :** इंग्रजी भाषा ही जागतिकीकरणात रोजगार निर्मितीचे प्रमुख साधन आहे! असे प्रतिपादन बंकटस्वामी महाविद्यालय, बीड येथिल इंग्रजी विभाग प्रमुख प्रा. डॉ.मनोजकुमार नवसे यांनी केले.ते इंग्रजी विभाग आयोजित "इंग्रजी भाषेतील रोजगार क्षमता वाढीसाठी आवश्यक कौशल्य" या विषयावरील व्याख्यानात व्याख्येते म्हणुन बोलत होते.पुढे बोलताना ते म्हणाले कि इंग्रजी ही आंतरराष्ट्रीय भाषा आहे.ती जगात बोलली जाते. म्हणुन जगभरात रोजगार मिळण्यासाठी सर्वांना इंग्रजी भाषा बोलता आली पाहिजे. अशी अपेक्षा व्यक्त केली.या प्रसंगी अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. विश्वास कदम सर हे होते. तर व्यासपीठावर अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षाचे समंन्वयक तथा इंग्रजी विभागाचे प्रा.विनोद किर्दक, प्रा. डॉ.सुनिल जाधव, प्रा. डॉ.वंदन जाधव यांची उपस्थिती होती. प्रस्ताविक प्रा.विनोद किर्दक यांनी केले.संचलन प्रा. डॉ. जाहेद सिध्दीकी यांनी केले.तर आभार प्रा. डॉ. वंदन जाधव यांनी व्यक्त केले.या प्रसंगी इंग्रजी विषयाचे बहुसंख्य विद्यार्थी उपस्थित होते.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), सोमवार २६ जानेवारी २०२६


## देवगाव रंगारी जिल्हा परिषद गट गणांत रंगलीय चौरंगी लढत




**कन्नड (अरुण थोरात) :** देवगाव रंगारी गट व त्यातील गणांत सर्वच राजकीय पक्षांनी उमेदवार दिल्याने या गटात चौरंगी लढत होण्याची चिन्हे दिसत आहेत.गेल्या पंचवार्षिक निवडणुकीत देवगाव रंगारी गटात भाजप रेणुका जाधव यांनी तर देवगाव रंगारी गणाचे शिवसेना चे गोकुळ गोरे, ताडपिंपळगाव गणात भाजप च्या सुरेखा बोडखे यांनी प्रतिनिधीत्व केले होते. त्यामुळे गेल्या निवडणुकीत भाजप पक्षाने वर्चस्व निर्माण केले होते. गेल्या सहा वर्षात पुला खालून बरेचसे पाणी वाहून गेल्याने भाजप ला येथे सत्ता राखण्यासाठी निकराचा संघर्ष करावा लागणार आहे. त्यांची खरी लढाई ही मित्र पक्षांशीच असल्याने युती तुटण्याचा परिणाम मतविभाजना वरती होऊ शकतो. मात्र तळागाळा पर्यंत पोहचलेले पक्ष संघटन ही मोठी जमेची बाजू आहे. शिवना टाकळी मध्यम सिंचन प्रकल्पा मुळे गट गण पाणीदार असले तरी गटाचा दक्षिण भाग मात्र कायम दुष्काळी सावटा खाली असतो. त्याच बरोबर गट गणांतील खराब रस्ते, रखडलेले रोजगार हमी तील वैयक्तिक लाभाच्या योजना, देवगाव रंगारी वेगळ्या तालुक्याची मागणी. कृषी प्रक्रिया उद्योग उभारणी आदी जुन्या मागण्यांची पुर्तता या भोवती प्रचार मुद्दा रंगाळत आहे. देवगाव रं. गटातून भाजप राज्य कार्यकारिणी सदस्य जेष्ठ डॉ. संजय गव्हाणे हे पहिल्यांदाच निवडणूक च्या रिंगणात उतरले आहेत. तर भाजप मधून शिवसेनेत दाखल झालेले रमेश जाधव यावेळी शिवसेने कडून रिंगणात उतरले आहेत. देवगाव रं. गणातून भाजपचे मंडल अध्यक्ष ललित सुरासे यांच्या पत्नी माया सुरासे या ही भाजप च्या तिकीटावर उभ्या आहेत. आपला पारंपारीक जेहूर गट अ.जमाती साठी राखीव निघाल्याने शिवसेना जेष्ठ नेते तथा माजी जि.प.अध्यक्ष डॉ. आण्णासाहेब शिंदे उबाठा(शिवसेना) च्या तिकीटावर देवगाव रं. गटात नशिब अजमावित आहेत. शिवसेनेचे रमेश जाधव, राष्ठवादी चे अनंता पवार, कांग्रेस चे विवेक शेळके, हे ही तगडे उमेदवार असल्याने लढत रंगतदार बनली आहे. अर्ज मागे घेण्याच्या शेवटच्या तारखे पर्यंत सेना-भाजप युतीचे काय होते. इतरांना पैकी कोण उमेदवारी मागे घेते. यावरती ही बरेच गणित बाकी आहे. शेवटी मतदार कोणाला कौल देतात. युती आघाडी तुटण्याचा व त्यातून होणाऱ्या मतविभाजनाचा कोणाला फायदा होतो. हे मतमोजणी नंतरच कळेल.

## दशकातील अस्सल ग्रामीण वास्तव मांडणारी कादंबरी

भाषा, कला, लोकजीवन व लोकवाड.मयाचे अभ्यासक, अहिराणी भाषा संशोधक आणि साहित्यिक डॉ. सुधीर राजाराम देवरे यांची राजहंस प्रकाशनाने अलीकडेच प्रकाशित केलेली ‘जीवदान’ ही कादंबरी म्हणजे कादंबरी लेखन शैलीच्या दृष्टीने एक आगळावेगळा अभिनव प्रयोग आहे. कुमारवय संपत येताना आणि जरा पौगंडावस्थेत आलेल्या ‘संजू’ नामक कथानायकास कौटुंबिक पातळीवर तत्कालीन परिस्थितीत आलेल्या वास्तव अनुभवांचे, त्याच्यावर गुदरलेल्या भयाण प्रसंगांचे अनेक गोष्टीतून ही अनवट कादंबरी चित्रमय पद्धतीने वाचकांसमोर समर्थपणे मांडते आणि हेच या कादंबरीचे ठळक बलस्थान आहे.

या कादंबरीत मोठ्या प्रमाणात अहिराणी भाषेचा (म्हणी, वाक्प्रचार, शिव्या, शब्द, नियमित वापरली जाणारी वाक्ये इ.) विविध संवादात, संभाषणात झालेला अंगभूत वापर वाचकाला सहज आपल्या कथासूत्रात गुंतवतो आणि ग्रामीण वास्तवाच्या जिवंत वातावरणात वाचकही सहज नकळत या कादंबरीतील एक पात्रच होतो. अहिराणी बोलीभाषा जाणणारे व त्या भवतालात वावरणारे वाचक तर या कादंबरीवर हमखास ‘लुब्ध’ होतील हे सांगणे न लगे.

नायकाने म्हणजे ‘संजू’ने आपल्या आईचा खून होतांना पाहिले आहे. ज्याने खून केला त्याला स्वतःच देहांताची शिक्षा दिली आहे. त्या खुन्याला शिक्षा दिल्यानंतर त्याला बालसुधारगृहात जावे लागले आहे. आपल्या इवल्याशा आयुष्यात त्याने जे काही सोसले आहे त्याची भावनिक आंदोलने आणि मनोव्यापार यांची धक्कादायक कहाणी साकारणारी शोकांतिका म्हणजे ‘जीवदान’ ही लघुकादंबरी. पानोपानी लेखकाने वाढवित नेलेली उत्कंठा आणि ‘परकायाप्रवेश’ वाचकास जो अनुभव देतो तो खासच. अशी लेखन व कथानक मांडणी हल्ली विरळच.

कादंबरीतल्या बऱ्याचशा घटना धक्कादायक सदरात मोडतील अशाच आहेत. सुरवातीला नायक ‘यशोदा’ नावाची कथा लिहितो. आणि नेमके खरे काय नि खोटे काय हे वाचकाला सांगत शेवटी तिची पुनर्रमांडणी करत वेगळ्या पद्धतीने सिनेमासाठी रचून चित्रपट निर्मात्याला देतो. “या सगळ्या प्रवासात खून केलेल्या एका माणसाची ही गोष्ट आहेच, नायकाच्या वडिलांचं क्रौर्य आहेच, पण तरीही दुःखाच्या किंवा शोकाच्या पांघरूणाखाली कादंबरी दडलेली नाही." असे जे या कादंबरीच्या प्रस्तावनेत शशिकांत सावंत यांनी म्हटले आहे त्याची प्रचिती वाचकास येते. प्रत्येक कादंबरीला एक चिवट जीवनदृष्टी हवी. कुणाच्या तरी जगण्यात आपण डोकावत आहोत हे भान द्यायला हवे हे सारे काही या कादंबरीत लेखकाने सहजतेने गुंफले आहे. प्रसंग – १, प्रसंग – २ यासारखे. प्रत्येक प्रसंगाचा ओरखडा मनावर उमटत राहतो. एखादा अभिजात चित्रपटच आपल्या डोळ्यांसमोरुन सरकत राहतो, असा अनुभव ही कादंबरी वाचकास देते.

या कादंबरीतील नायकाकडे अल्पवयातच निरीक्षण बुद्धी आहे. तल्लखपणा आहे. त्यामुळे वडिलांनी वेळोवेळी सांगितलेल्या अनेक गोष्टी तो टिपून ठेवतो. या आडव्या- उभ्या कथांनीच कादंबरीचा पोत अस्सल झाला आहे. दारू पिणारे शिक्षक वडील, परंपरेच्या बंधनात अडकलेली नायकाची आई, दोन बहिणी आणि यशोदा भक्तीण, बालसुधार गृहाचे अधीक्षक, सिनेनिर्माते जहागिरदार, भक्तिणीचा नवरा, सोनारकाका, सावळा गुरुजी, लक्ष्मीकाकू, चिंधा मास्तर इ. कथानकातील सारी पात्रे कादंबरीस सहज, स्वाभाविकपणे पुढे नेणारी व म्हणूनच महत्त्वाची आहेत.

‘पिंजरा’ व ‘शोले’ चित्रपट पहावयास जाणे, वडिलांच्या शाळेत जाणे, शाळेच्या इन्स्पेक्शन, सटाण्याची जत्रा इ. प्रसंग कथानकात लेखकाने बेमालूमपणे आणि बारीकीने मिसळले आहेत. या प्रसंगातील संवादही खासच. कपालेश्वरच्या शाळेला दिलेल्या भेटीचं एक उदाहरण बघा... “जोरणहून कपालेश्वरच्या शाळेला दादांना (संजूचे वडील) पायी जावं लागायचं. एकशिक्षकी शाळेवर ते एकमेव शिक्षक होते. त्या शाळेवर दादा एकदा संजूला घेऊन जायचे ठरवतात. या गावाला जाण्यासाठी जोरण या गावी मुक्काम करून दुसऱ्या दिवशी सकाळी पुढे जातात. तळवाडे मुक्कामी गाडीने ते निघाले. त्याकाळी कुठल्याच गावात वीज नसल्याने अंधारातच प्रवास करीत गाडी जोरण गावात पोहचली. तिथे रस्त्याने चालता चालता दादा संजूला म्हणाले, "आपू ज्यास्नकडे चालनूत त्या तुन्हा मामा मामी लागतस बर का, म्हनीसन त्यासले हाक मारतांना मामा–मामी म्हन.." आम्ही ज्यांच्या घरी गेलो ते मामा झोपून गेले होते. दादांनी दार वाजवल्यावर मामांनी दार उघडले. काय कशे काय विचारपूस होऊन पाणी पिल्यावर घरातल्या मामीनं विचारलं, “सैपाक करू का?" दादा म्हणाले, “नका. आम्ही जेवन करी वनूत. रामपहारेच कपालेश्वरले लवकर जान पडयी. हाऊ मन्हा संजू शे. त्याले कपालेश्वर पान्ह व्हत म्हनीसन त्यालेबी घीद सोबत." मामा म्हणाले, "आशे का. बर जाये ना घी वनात ते." मग त्यांनी आम्हाला ओसरीत झोऱ्या टाकून दिला. पांघरायला गोधड्या दिल्या. आम्ही झोपून घेतलं. सकाळीज उठलो. चहापाणी झाला. मग मामा बाहेर गेले नि येताना सोबत मटण घेऊन आले. सकाळी सकाळी कपालेश्वरला जाऊच दिल नाही. मी दादांना म्हटलं, "आता तुमनी शाळा बुडयी ना."

दादा म्हणाले, "तशे चाली जास रे एखादं याळे, काय करस मंग आते. जेवन करी जाऊत उकाव. स्वयंपाक होतो तोपर्यंत मामांनी आणि दादांनी मांगलदारी बसून दारू पिली. मग मटणाची भाजी खाल्ली.’’ हा सारा प्रसंगच वाचनीय आणि तत्कालीन परिस्थिती मांडणारा आहे. यात मामाची ‘मंगल’ नावाची जी मुलगी आहे तिच्याबद्दल कथानायकाच्या मनात पौगंडावस्थेत निर्माण झालेली हुरहूर लेखकाने अशी काही मांडली आहे की बस ‘खासम खासच’.

वरील प्रकारचे या कादंबरीत आलेले अनेक प्रसंग वाचकास त्याच्या भूतकाळात अलगद घेऊन जातात. ‘हाई रांडन काय जातवान शे रे!’ हा दादांचा डायलॉग तर खासच. एकूण ‘जीवदान’ ही कादंबरी या दशकातील ग्रामीण वास्तव ठळकपणे मांडते आणि जाणिवांना मोठे बळ देते. म्हणून ती वाचायलाच हवी अशी शिफारस नक्कीच करेन, करायलाच हवी. कारण सारे काही अस्सल आणि आपले वाटणारे यात आपणास पानोपानी भेटते.

**जीवदान (लघुकादंबरी), डॉ. सुधीर राजाराम देवरे राजहंस प्रकाशन, पुणे पहिली आवृत्ती- नोव्हेंबर २०२५. पृ. १२०, मूल्य- २०० /— रु.**

**• जनार्दन देवरे, (९०११६९४८८५)**


ADMISSION OPEN
10th, 12th and Graduate Students
Government Recognised
Job Guarantee Courses
DMLT | P.G.DMLT
X-RAY | C.T.-SCAN
E.C.G. | Radiology
Physiotherapy | Optometry
O. T. TECHNICIAN
PG Radiology
Contact: 9405109103 8830838903



प्रतिनिधी नेमणे आहे

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहेत. तालुक्यातील राजकीय, सामाजिक, सांस्कृतिक तसेच शैक्षणिक क्षेत्राची माहिती असणाऱ्यास प्राधान्य ! इच्छुकांनी आपला अल्पपरिचय (बायोडाटा) ७५८८००५००२ या नंबरवर Whatsup करावा.

दै. महाराष्ट्र जनशक्ती हे महाराष्ट्रातील मराठी भाषेत वाचले जाणारे प्रमुख ई-दैनिक आहे. आपल्या व्यवसायाची जाहिरात करून व्यवसायवृद्धी करा.

महाराष्ट्र जनशक्ती
website: www.maharashtrajanshaktinews.com
छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), सोमवार २६ जानेवारी २०२६

# मतदार : भारतीय लोकशाहीचा आत्मा

२५ जानेवारी हा दिवस भारतात 'राष्ट्रीय मतदार दिन' म्हणून साजरा केला जातो. हा दिवस केवळ एका औपचारिक शासकीय कार्यक्रमापुरता मर्यादित नसून भारतीय लोकशाहीच्या आत्म्याशी जोडलेला एक अत्यंत महत्त्वाचा सामाजिक आणि राजकीय संदर्भ आहे. लोकशाही व्यवस्थेची खरी ओळख तिच्या संविधानात, संस्थांमध्ये किंवा कायद्यांमध्ये नसून तिच्या मतदारांमध्ये असते. मतदार हा लोकशाहीचा कणा आहे. त्याच्या जाणीवेवर, सहभागावर आणि सामाजिक भानावर लोकशाहीची दिशा ठरते. म्हणूनच राष्ट्रीय मतदार दिन हा केवळ मतदार नोंदणी किंवा मतदानाची प्रक्रिया आठवण करून देणारा दिवस नसून, मतदार म्हणून नागरिकाची सामाजिक, नैतिक आणि राजकीय भूमिका पुन्हा तपासण्याचा एक महत्त्वाचा क्षण आहे.भारतीय लोकशाहीचा प्रवास हा जगातील सर्वात मोठा आणि सर्वात विविधतेने भरलेला लोकशाही प्रयोग मानला जातो. स्वातंत्र्यानंतर भारताने सार्वत्रिक प्रौढ मताधिकार स्वीकारण्याचा निर्णय घेतला, तो केवळ राजकीय नव्हे तर समाजशास्त्रीय दृष्टिकोनातूनही क्रांतिकारी होता. त्या काळात भारतात निरक्षरतेचे प्रमाण मोठे होते, दारिद्र्य व्यापक होते आणि जात, वर्ग, लिंग व धर्माच्या आधारे समाज खोलवर विभागलेला होता. अशा परिस्थितीत प्रत्येक प्रौढ नागरिकाला समान मताचा अधिकार देणे हे केवळ धाडसीच नव्हे, तर सामाजिक समतेवर आधारित लोकशाहीची ठाम भूमिका मांडणारे पाऊल होते. या निर्णयामुळे भारतीय समाजातील वंचित, दुर्लक्षित आणि उपेक्षित घटकांना राजकीय मंचावर स्थान मिळाले आणि सत्तेच्या प्रक्रियेत सहभागी होण्याची संधी प्राप्त झाली.समाजशास्त्रीय दृष्टीकोनातून पाहिले असता लोकशाही ही केवळ शासनाची पद्धत नसून ती एक व्यापक सामाजिक प्रक्रिया आहे. समाजातील मूल्ये, परंपरा, सत्तासंबंध, आर्थिक रचना आणि सांस्कृतिक घटक यांचा लोकशाहीवर खोल परिणाम होत असतो. मतदार हा या सर्व घटकांच्या संगमातून घडलेला असतो. व्यक्तीचे मतदानवर्तन हे केवळ तिच्या वैयक्तिक पसंतीवर आधारित नसते, तर तिच्या सामाजिक ओळखीवर, जीवनानुभवांवर आणि सामूहिक वास्तवावर आधारित असते. जातीय रचना, वर्गीय विषमता, शैक्षणिक संधी, रोजगाराची स्थिती, लिंगसंबंध आणि माध्यमांचा प्रभाव या सर्वांचा मतदानावर प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष परिणाम होत असतो.भारतीय राज्यघटनेने मतदाराला केवळ मताचा अधिकार दिला नाही, तर त्या अधिकारामागे सामाजिक न्यायाची आणि समतेची व्यापक संकल्पना मांडली. संविधानातील समानतेचे तत्त्व, मूलभूत हक्क आणि राज्याची मार्गदर्शक तत्त्वे ही सर्व मतदाराच्या सशक्तीकरणाशी जोडलेली आहेत. मतदानाच्या माध्यमातून नागरिक केवळ प्रतिनिधी निवडत नाही, तर तो शासनाच्या दिशेला, धोरणांना आणि प्राधान्यांना आकार देतो. त्यामुळे मत देणे हा केवळ अधिकार नसून तो एक सामाजिक कर्तव्य आहे, असे समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून ठामपणे म्हणता येते.राष्ट्रीय मतदार दिनाची संकल्पना मतदार नोंदणी वाढविणे, मतदानाबाबत जागरूकता निर्माण करणे आणि लोकशाही मूल्यांचे जतन करणे या उद्देशाने राबविली जाते. मात्र लोकशाहीची गुणवत्ता केवळ मतदानाच्या टक्केवारीवर मोजता येत नाही. माहितीपूर्ण, विवेकी आणि जबाबदार मतदान ही खरी लोकशाहीची कसोटी असते. आजच्या काळात माध्यमांचा वाढता प्रभाव, जाहिराती, सोशल मीडिया, भावनिक प्रचार आणि ओळखींचे राजकारण यामुळे मतदाराच्या निर्णयप्रक्रियेवर अनेक प्रकारचे दबाव निर्माण होत आहेत. समाजशास्त्रीय अभ्यासातून असे दिसते की जेव्हा माहिती अपुरी, एकांगी किंवा चुकीची असते, तेव्हा मतदान भावनांवर आधारित होते आणि लोकशाहीची गुणवत्ता घसरते.मतदान संस्कृती ही कोणत्याही समाजाच्या लोकशाही परिपक्वतेचे प्रतिबिंब असते. मतदान ही केवळ निवडणुकीच्या दिवशी पार पाडायची प्रक्रिया नसून ती दीर्घकाळ घडत जाणारी सामाजिक संस्कारांची प्रक्रिया आहे. कुटुंब, शाळा, महाविद्यालये, समाज, माध्यमे आणि सार्वजनिक चर्चेच्या माध्यमातून मतदानाबाबतची मूल्ये आणि भूमिका घडत असतात. ज्या समाजात मतभिन्नतेचा सन्मान केला जातो, प्रश्न विचारण्याची मुभा असते आणि विवेकी चर्चेला स्थान असते, त्या समाजात मतदान अधिक सशक्त आणि अर्थपूर्ण ठरते. याउलट ज्या ठिकाणी भीती, दबाव, प्रलोभन किंवा संकुचित ओळखी प्रभावी असतात, तेथे मतदानाची प्रक्रिया मर्यादित होते.भारतीय समाजात मतदान संस्कृती हळूहळू विकसित होत गेली आहे. सुरुवातीच्या काळात अनेक नागरिकांसाठी मतदान ही नवीन आणि अपरिचित संकल्पना होती. कालांतराने निवडणुकांची सातत्यपूर्ण प्रक्रिया, राजकीय चळवळी आणि सामाजिक जागरूकता यामुळे मतदान हे नागरिकत्वाचे महत्त्वाचे लक्षण बनले. तरीही आजही काही भागांत जातीय समीकरणे, स्थानिक सत्तासंबंध, आर्थिक प्रलोभने आणि दबाव मतदानावर प्रभाव टाकताना दिसतात. या वास्तवाकडे डोळसपणे पाहूनच लोकशाही अधिक सुदृढ करण्याचे प्रयत्न करावे लागतील.महिलांचा मतदानातील सहभाग हा समाजातील लिंगसमानतेचा आणि सामाजिक परिवर्तनाचा एक महत्त्वाचा निर्देशांक मानला जातो. भारतात दीर्घकाळ महिलांना सार्वजनिक आणि राजकीय क्षेत्रापासून दूर ठेवले गेले होते. पितृसत्ताक रचना, शिक्षणाचा अभाव आणि सामाजिक बंधने यामुळे महिलांचा राजकीय सहभाग मर्यादित राहिला. मात्र स्वातंत्र्यानंतर सार्वत्रिक मताधिकारामुळे महिलांना मतदानाचा हक्क मिळाला आणि हळूहळू त्यांच्या सामाजिक भूमिकेत बदल घडू लागला. गेल्या काही दशकांत महिलांच्या मतदानाचे प्रमाण लक्षणीयरीत्या वाढले आहे. अनेक निवडणुकांमध्ये महिला मतदारांचे प्रमाण पुरुषांच्या बरोबरीने किंवा काही वेळा त्याहून अधिक आढळते. समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून पाहता हा बदल महिलांच्या शिक्षणात वाढ, आर्थिक सहभाग, स्वयं-सहायता गट, स्थानिक स्वराज्य संस्थांतील आरक्षण आणि वाढते सामाजिक आत्मभान यांचा परिणाम आहे.तरुण मतदार हा भारतीय लोकशाहीचा भविष्यकाळ आहे. भारताची लोकसंख्या मोठ्या प्रमाणावर तरुण असून १८ ते २९ वयोगटातील मतदारांची संख्या लक्षणीय आहे. तरीही अनेक वेळा तरुणांमध्ये मतदानाबद्दल उदासीनता दिसून येते. बेरोजगारी, अस्थिर रोजगार, स्थलांतर, शिक्षणाचा ताण आणि राजकारणाबद्दलची नाराजी यामुळे काही तरुण लोकशाही प्रक्रियेपासून दूर राहतात. समाजशास्त्रीय अभ्यासातून असे दिसते की जेव्हा तरुणांना राजकारणात आपले प्रश्न, आकांक्षा आणि भविष्य प्रतिबिंबित होताना दिसत नाही, तेव्हा ते मतदानाकडे पाठ फिरवतात. मात्र पर्यावरण, सामाजिक न्याय, शिक्षण, रोजगार, भ्रष्टाचारविरोधी चळवळी आणि नागरिक हक्क यांसारख्या मुद्द्यांवर तरुणांचा सहभाग वाढत असल्याचेही स्पष्टपणे दिसते. राष्ट्रीय मतदार दिन हा तरुणांना माहितीपूर्ण, चिकित्सक आणि सक्रिय मतदार म्हणून घडविण्याची एक महत्त्वाची संधी आहे.ग्रामीण आणि शहरी मतदारांच्या वर्तनात समाजशास्त्रीय फरक स्पष्टपणे आढळतात. ग्रामीण भागात अजूनही नातेवाईक संबंध, स्थानिक नेतृत्व, जातीय रचना आणि थेट संपर्क यांचा प्रभाव अधिक असतो. शहरी भागात माध्यमे, विकासाचे मुद्दे, पायाभूत सुविधा, रोजगार आणि जीवनशैलीशी संबंधित प्रश्न अधिक प्रभावी ठरतात. तथापि, शिक्षण, संपर्क, स्थलांतर आणि तंत्रज्ञानाच्या वाढीमुळे हे विभाजन हळूहळू कमी होत आहे. ग्रामीण भागातही मुद्देसूद आणि जाणीवपूर्वक मतदान वाढत आहे, तर शहरी भागातही भावनिक आणि ओळखींचे राजकारण काही प्रमाणात प्रभावी ठरत आहे. त्यामुळे मतदार वर्तन हे स्थिर नसून सतत बदलणारे सामाजिक वास्तव आहे.मतदार शिक्षण आणि जनजागृती कार्यक्रमांची भूमिका लोकशाहीच्या बळकटीकरणासाठी अत्यंत महत्त्वाची आहे. निवडणूक आयोगाने मतदार नोंदणी, मतदान प्रक्रिया, ईव्हीएम आणि व्हीव्हीपॅट यांविषयी जनजागृतीसाठी विविध उपक्रम राबविले आहेत. मात्र समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून प्रभावी मतदार शिक्षण हे केवळ तांत्रिक माहितीपुरते मर्यादित नसावे. त्यात राज्यघटनेची मूल्ये, मूलभूत हक्क व कर्तव्ये, सामाजिक न्याय, समता, स्वातंत्र्य आणि बंधुता या तत्त्वांचा समावेश असणे आवश्यक आहे. शाळा, महाविद्यालये, स्वयंसेवी संस्था आणि माध्यमांनी दीर्घकालीन पातळीवर मतदार शिक्षणासाठी प्रयत्न करणे ही काळाची गरज आहे.लोकशाही व्यवस्थेतील विश्वास हा एक नाजूक पण अत्यंत महत्त्वाचा घटक आहे. मतदारांचा निवडणूक प्रक्रिया, राजकीय संस्था आणि लोकप्रतिनिधींवर विश्वास असेल तर लोकशाही सुदृढ राहते. भ्रष्टाचार, अपारदर्शकता, खोटे आश्वासने आणि नैतिकतेचा अभाव यामुळे हा विश्वास डळमळीत होऊ शकतो. समाजशास्त्रीय अभ्यासातून असे स्पष्ट होते की जेव्हा लोकांना व्यवस्था आपली वाटत नाही, तेव्हा ते मतदानापासून दूर राहतात किंवा निष्क्रिय बनतात. त्यामुळे राष्ट्रीय मतदार दिनाच्या निमित्ताने लोकशाही संस्थांवरील विश्वास पुनर्स्थापित करणे ही सामूहिक जबाबदारी आहे.मतदान न करणे हाही एक सामाजिक संदेश असतो. अनेकदा मतदान न करण्यामागे निराशा, पर्यायांचा अभाव किंवा व्यवस्थेवरील अविश्वास कारणीभूत असतो. परंतु ही निष्क्रियता लोकशाहीसाठी घातक ठरू शकते. मतदान न केल्याने निर्णय इतरांच्या हाती जातो आणि प्रतिनिधित्वातील तफावत वाढते. त्यामुळे प्रत्येक मतदाराने आपल्या मताचे सामाजिक आणि राजकीय महत्त्व ओळखणे आवश्यक आहे. लोकशाहीत बदल घडविण्याचे सर्वात प्रभावी साधन म्हणजे मतपत्रिका हे राष्ट्रीय मतदार दिन ठामपणे अधोरेखित करतो.डिजिटल युगात लोकशाहीसमोर नव्या संधी आणि आव्हाने उभी आहेत. सोशल मीडिया, ऑनलाइन माहिती आणि डिजिटल संवादामुळे नागरिकांचा सहभाग वाढू शकतो. मात्र त्याचबरोबर चुकीची माहिती, अफवा, द्वेषपूर्ण प्रचार आणि ध्रुवीकरण यांचे धोकेही वाढले आहेत. समाजशास्त्रीयदृष्ट्या डिजिटल साक्षरता ही आधुनिक मतदार साक्षरतेचा अविभाज्य भाग बनली आहे. माहितीची पडताळणी, विवेकी विचार आणि जबाबदार अभिव्यक्ती या कौशल्यांशिवाय लोकशाहीची गुणवत्ता टिकविणे कठीण आहे.शेवटी असे म्हणता येईल की राष्ट्रीय मतदार दिन हा भारतीय लोकशाहीच्या आत्म्याचा उत्सव आहे. मतदार हा केवळ निवडणुकीतील एक घटक नसून तो समाजपरिवर्तनाचा सक्रिय वाहक आहे. विविधतेने भरलेल्या भारतीय समाजात मतदार लोकशाहीला व्यापक, सर्वसमावेशक आणि सजीव बनवतो. राष्ट्रीय मतदार दिनाच्या निमित्ताने प्रत्येक नागरिकाने आपला मताधिकार हा केवळ हक्क नव्हे, तर सामाजिक कर्तव्य म्हणून स्वीकारावा. माहितीपूर्ण, नैतिक, जागरूक आणि जबाबदार मतदार घडविणे हीच सशक्त, स्थिर आणि न्याय्य लोकशाहीची खरी हमी आहे.



डॉ. राजेंद्र बगाटे
(लेखक, समाजशास्त्राचे अभ्यासक आहेत)
bagate.rajendra5@gmail.com

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), सोमवार २६ जानेवारी २०२६


## सारेच संदर्भ

सारेच संदर्भ
येत नाही पकडता
प्रत्येक वेळी शब्दांना
म्हणून हसत होती कविता
कच्चं मडकं म्हणत मला..

पण तिला कोणी सांगावं
इतभर पोटासाठी
रात्रदिस राबताना
सुटून जातात बऱ्याच ओळी
हातातून अनेकदा
कागदावर येण्याआधी..

खरं तर
शब्द कधीच करत नाही गद्दारी
इथल्या रंगबदलू सरड्यांसारखे
पण मावत नाही प्रत्येक वेळी
लहानशा ओंजळीत माझ्या..

म्हणून आता
ओंजळ मोठी करतो आहे
मन बुद्धी सोबत सद्विचारांची

अन् क्षितिजापल्याड पाहण्यासाठी
लावतो आहे डोळ्यावर
कोणत्याही रंगाची अलर्जी नसणारा
आरपार दिसणारा
माणूसपण जपणारा चष्मा नवा..

**कवी ज्ञानेश्वर गायके,**
कन्नड

## महान या भारतात

जगी महान हो राष्ट्र
देश भारत महान
ध्वज लहरे गगणी
वाढे भारताची शान

हिमालय उंच ऊभा
घाली गगणाशी साद
सह्याद्रीचे हृदय उंच
घुमे हो शौर्याचा नाद

धरतीचा स्वर्ग इथे
अवतरे काश्मीरात
फुले हो नंदनवन
महान या भारतात

करूनीया हो संघर्ष
मिळविले हो स्वातंत्र्य
बलिदान दिले विरांनी
होती वैर्याची रात्र

जानेवारी सव्विस दिनी
प्रजासत्ताक देश झाला
जगी महान लोकशाही
राबवत सदैव राहीला



काव्यरचना
**संदिप नानासाहेब वाकडे**
रा.खेडा ता.कन्नड

# कमळाचा हिरवा देठ म्हणजे एमआयएम का ?
# सुषमा अंधारेंचा इम्तियाज जलीलांना खोचक सवाल





**मुंबई :** देशात आणि महाराष्ट्रात सुरू असलेल्या सध्याच्या राजकीय घडामोडींमुळे कोण कोणासोबत कधी युती करेल किंवा कोणता नेता कधी पक्ष बदलेल, याचा अंदाज लावणं कठीण झालं आहे. अशाच अनपेक्षित राजकीय समीकरणांचा अनुभव सोलापूर जिल्ह्यातील बार्शी तालुक्यात पाहायला मिळतो आहे. जिल्हा परिषद निवडणुकीत भाजपविरोधात दोन शिवसेना आणि दोन राष्ट्रवादी काँग्रेस एकत्र येऊन निवडणूक लढवत असल्याने राज्यभरात चर्चेला उधाण आलं आहे. कट्टर विरोधक असलेल्या दोन शिवसेनेला एकत्र आणण्याची कसरत बार्शीचे आमदार दिलीप सोपल यांनी केल्याचं सांगितलं जात आहे. या निर्णयामुळे अनेक नेते आणि राजकीय निरीक्षक चकित झाले असून, यावर शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे गटाच्या सोलापूर जिल्हा संपर्कप्रमुख सुषमा अंधारे यांनी आपली स्पष्ट भूमिका मांडली आहे.

सुषमा अंधारे यांनी ठामपणे सांगितले की, बार्शीतील हा निर्णय पक्षाचा अधिकृत निर्णय नाही. तो तिथल्या आमदारांनी त्यांच्या सदसद्विवेक बुद्धीने घेतलेला निर्णय आहे. शिवसेना युबीटीची अधिकृत भूमिका वेगळी असून, या युतीला पक्षाची मान्यता नाही. पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी स्वतः आमदारांशी चर्चा करणार असल्याचंही त्यांनी स्पष्ट केलं. आम्ही भाजपला हरवण्यासाठी जे कोणी लढत आहेत, त्यांच्या सोबत आहोत. मात्र बार्शीतील युती ही आमची युती नाही, असे ठाम शब्दांत त्यांनी सांगितले. बार्शीत पक्षाला किंवा कार्यकर्त्यांना आपली गरज भासली, तर पक्षप्रमुखांशी चर्चा करून भूमिका ठरवू, असंही अंधारे म्हणाल्या.

भाजपवर टीका करताना सुषमा अंधारे यांनी तीव्र शब्दांचा वापर केला. भाजप हा काही धुतल्या तांदळाचा पक्ष नाही, असं म्हणत त्यांनी भाजपकडे पैशाची आणि सत्तेची ताकद अधिक असल्याचा आरोप केला. त्यांच्याकडे मनी आणि मसल पॉवर असेल, पण आमच्याकडे मेंटल पॉवर जास्त आहे, असं त्या म्हणाल्या. स्वतःबद्दल बोलताना त्यांनी सांगितलं की, त्या एक साधी चळवळीतील कार्यकर्ती असून, महिला असल्याचं विक्टिम कार्ड कधीच खेळत नाहीत. सहकाऱ्यांनाही त्यांनी स्पष्ट इशारा दिला की, मला बाई म्हणून हलक्यात घेऊ नका, घेतलंत तर अडचण होईल. मी आई-बहिणीसारखी वागते, पण संघटनेच्या कामात मी कठोर आणि ठाम आहे, असंही त्यांनी नमूद केलं.

शिवसेनेत प्रथमच एका महिलेला जिल्हा संपर्कप्रमुखपद देण्यात आलं, याचा उल्लेख करत अंधारे यांनी पक्षाच्या निर्णयाचं समर्थन केलं. संघटना मजबूत करण्यासाठी जबाबदाऱ्या स्पष्टपणे दिल्या जात असल्याचं त्या म्हणाल्या. जे लोक शिवसेना सोडून भाजपमध्ये गेले, त्यांच्यावर कारवाई होणार का, या प्रश्नावर त्यांनी सूचक उत्तर दिलं. दिल्या घरी सुखी राहा, असं म्हणत त्यांनी उद्धव ठाकरे हे बागेश्वर बाबा नाहीत, असं सांगितलं. ते एकाच वेळी सर्व ठिकाणी उपस्थित राहू शकत नाहीत. त्यामुळे प्रत्येक जिल्ह्यात प्रतिनिधी नेमले असून, ते आपली जबाबदारी पार पाडत आहेत. जर कोणी ती जबाबदारी नीट पार पाडली नाही, तर आजपासूनच कारवाईची सुरुवात होईल, असा इशाराही त्यांनी दिला.

भाजपवर हल्लाबोल करताना सुषमा अंधारे म्हणाल्या की, भाजप हा नेते चोरणारा पक्ष आहे, तर शिवसेना नेते घडवणारा पक्ष आहे. शिवसेना हा २० टक्के राजकारण आणि ८० टक्के समाजकारण करणारा पक्ष असून, संघर्ष करत पुढे जाणारी संघटना आहे, असं त्या म्हणाल्या. सोलापूर जिल्ह्याच्या राजकारणावर भाष्य करताना त्यांनी सांगितलं की, हा जिल्हा पूर्वी काँग्रेसचा गड होता. मात्र काँग्रेसला मागे टाकत भाजप इथे पुढे आला, आणि यामागे सत्तेचा गैरवापर असल्याचा आरोप त्यांनी पालकमंत्री जयकुमार गोरे यांच्यावर केला.

जयकुमार गोरे यांनी प्रणिती शिंदेंबाबत केलेल्या वक्तव्यावरही सुषमा अंधारे यांनी खोचक टोला लगावला. त्यात काय विशेष आहे? तो भाजपचा संस्कार आहे, असं म्हणत त्यांनी भाजपवर टीका केली. कुलदीप सिंगरची मिरवणूक काढणारी आणि बदलापूर प्रकरणात तुषार आपटेला स्वीकारणारी भाजप असल्याचा उल्लेख करत त्यांनी भाजपच्या नैतिकतेवर प्रश्नचिन्ह उपस्थित केलं. गोरे यांनी प्रणिती शिंदेंना भगिनी मानून काहीच बोलणार नाही, असं म्हटलं असतं, तर तीच खरी बातमी ठरली असती, असा टोमणाही त्यांनी लगावला.

इम्तियाज जलील यांच्या 'महाराष्ट्र हिरवा करण्याच्या' वक्तव्यावर प्रतिक्रिया देताना सुषमा अंधारे यांनी उपरोधिक सवाल उपस्थित केला. इम्तियाज जलील यांच्याबद्दल आपल्याला आदर असल्याचं सांगून त्यांनी स्क्रिप्टेड गेममध्ये आपल्याला रस नसल्याचं स्पष्ट केलं. भाजपच्या झेंड्यात भगवा आणि हिरवा रंग आहे, कमळाच्या देठाचाही रंग हिरवाच आहे, मग हा हिरवा रंग म्हणजे एमआयएम आहे का, असा प्रश्न उपस्थित करत त्यांनी भाजप आणि एमआयएम यांच्यातील राजकीय रंगसंगतीवर अप्रत्यक्ष टीका केली. एकूणच, बार्शीतील युतीवरून सुरू झालेल्या चर्चेला सुषमा अंधारेंच्या या आक्रमक भूमिकेमुळे नवं वळण मिळालं आहे.


मराठवाड्यातील नं. १ चे डी.टी.पी. सेंटर
**साहिल कॉम्प्युटर्स अॅण्ड प्रिंटर्स**
डॉ.बा.आं.म.विद्यापीठ गेटजवळ, जयसिंगपुरा, औरंगाबाद.
मो. 8087880274, 8956362639, 9270446603, 9405109103
**डी.टी.पी. (मराठी, हिंदी, इंग्रजी)**
- प्रोजेक्ट रिपोर्ट
- डेझर्टेशन
- पीएच.डी./एम.फिल.थेसिस
- कलर प्रिंट
- डी.एड.,एम.एड.प्रोजेक्ट
- स्कॅनिंग
- स्पायरल व हार्ड बायडींग
- लॅमिनेशन

महाराष्ट्रातील सर्वच विद्यापीठाच्या 1300 पेक्षा जास्त पीएच.डी. 1500 एम.फिल., 4000 हून अधिक डेझर्टेशन्सचा अनुभव, कुशल ऑपरेटर्स, लाईट गेल्यास इन्व्हर्टरची सोय असलेले मराठवाड्यातील नं. 1 चे डी.पी.पी. सेंटर

अनुभव नसलेल्यांकडे जाऊन मानसिक व आर्थिक त्रास करून घेण्यापेक्षा..
अनुभवी ऑपरेटर्सकडून अचूक व उत्कृष्ट कामासाठी अवश्यक संपर्क साधा.

Contact No.- 8956362639 / 8087880274
Email - sahilcomputer05@gmail.com